शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ८वी

विषय – मराठी (प्रथम भाषा)

घटक 3 – कार्यात्मक व्याकरण

भारांश – 44%   प्रश्नसंख्या – 11   एकूण गुण 22

3.4 लिंगविचार –

नामाच्या रूपावरून एखादी वस्तू वास्तविक अगर काल्पनिक पुरुषजातीची आहे की स्त्रीजातीची आहे की दोन्हीपैकी कोणत्याही जातीची नाही असे ज्यावरून कळते त्याला त्या शब्दाचे लिंग म्हणतात.

मराठीत तीन लिंगे मानतात.

1) पुल्लिंग – जो शब्द पुरुषपणाचे लक्षण दाखवतो. यांचा उल्लेख आपण '**तो**' या शब्दाने करतो.
2) स्त्रीलिंग – जो शब्द स्त्रीपणाचे लक्षण दाखवतो. यांचा उल्लेख आपण '**ती**' या शब्दाने करतो.
3) नपुंसकलिंग – जिथे पुरुषपण किंवा स्त्रीपण नेमके काय ते सांगता येत नाही त्या नामाचे लक्षण दाखवणारा शब्द. यांचा उल्लेख आपण '**ते**' या शब्दाने करतो.

	पुल्लिंग	स्त्रीलिंग	नपुंसकलिंग
पशु पक्ष्यातील लिंगभेद	बैल	गाय	वासरू
	चिमणा	चिमणी	पिल्लू
निर्जीव वस्तूंचे लिंग	दिवा	पणती	तेज
भाववाचक नाम	मृत्यू	भीती	दु:ख
'आकारान्त' पुल्लिंगी,	पोरगा	पोरगी	पोरगे
'इकारान्त' स्त्रीलिंगी,	कुत्रा	कुत्री	कुत्रे
'एकारान्त' नपुसकलिंगी	घोडा	घोडी	घोडे
परभाषेतून आलेले शब्द	क्लास	पेन्सिल	बुक
सामासिक शब्द	भाजीपाला	मीठभाकरी	देवघर
शब्दाचा निरनिराळ्या लिंगात	पोर	पोर	पोर
वापर	वेळ	वेळ	-
एकाच अर्थाचे भिन्नलिंगी शब्द	वाडा	इमारत	घर

- काही प्राणीवाचक पुल्लिंगी शब्दांस '**ईन**' प्रत्यय लागून त्याची स्त्रीलिंगी रूपे होतात. उदा. वाघ – वाघीण, सिंह – सिंहीण.
- काही प्राणीवाचक '**अकारान्त**' पुल्लिंगी नामांची स्त्रीलिंगी रूपे '**ईकारान्त**' होतात.

उदा. देव – देवी, तरुण – तरुणी.

- काही ‘**आकारान्त**’ पुल्लिंगी पदार्थवाचक नामांना ‘**ई**’ प्रत्यय लागून त्याची लघुत्वदर्शक स्रीलिंगी रूपे होतात.
  उदा. लोटा – लोटी, खडा- खडी.
- संस्कृतातून मराठीत आलेल्या नामांची स्रीलिंगी रूपे ‘**ई**’ प्रत्यय लावून होतात.
  राजा – राज्ञी, जनक-जननी.
- काही शब्दांची स्रीलिंगी रूपे स्वतंत्र्य रीतीने होतात.
  उदा. रेडा-म्हैस, मोर-लांडोर.
- परभाषेतून आलेल्या शब्दांचे लिंग त्याच अर्थाच्या मराठी शब्दाच्या लिंगावरून ठरवितात.
  उदा. बूट (जोडा)- पु.
- सामासिक शब्दाचे लिंग हे शेवटच्या शब्दाच्या लिंगाप्रमाणे असते.
  उदा. पुरणपोळी (स्री.)

3.5 वचनविचार –

वचन म्हणजे नामांची किंवा वस्तूंची संख्या.

एकवचन – नामाच्या रूपावरून जेव्हा एका वस्तूचा बोध होत असेल तर एकवचन होय.

उदा. आंबा, पंखा.

अनेकवचन- नामाच्या रूपावरून जेव्हा अनेक वस्तूचा बोध होत असेल तर अनेकवचन होय.

उदा. आंबे, पंखे.

पुल्लिंगी नामांची अनेकवचने –

नियम 1 - आकारान्त पुल्लिंगी नामाचे अनेकवचन एकारान्त होते. (अपवाद - दादा, मामा असे नातेवाचक शब्द)

उदा. फळा – फळे, लांडगा- लांडगे, मळा- मळे.

नियम 2 -आकारान्ताशिवाय इतर सर्व पुल्लिंगी नामांची रूपे दोन्ही वचनांत सारखीच असतात.

उदा. कवी- कवी, कागद- कागद, मध- मध.

स्त्रीलिंगी नामांची अनेकवचने-

नियम 1 - काही अकारान्त स्त्रीलिंगी नामांचे अनेकवचन आकारान्त होते, तर काहींचे ईकारान्त होते.

उदा. वाट – वाटा, पाल – पाली, मगर – मगरी.

'य' नंतर ई आल्यास उच्चारात 'य' चा लोप होतो.

उदा. गाय-गायी-गाई, सोय-सोयी-सोई.

नियम 2 - आकारान्त स्त्रीलिंगी तत्सम नामाचे अनेकवचन एकवचनासारखेच राहते.

उदा. कला- कला, माता – माता.

नियम 3 – ईकारान्त नामाचे अनेकवचन याकारान्त होते.

उदा. चांदणी- चांदण्या, गादी- गाद्या, वाडी- वाड्या.

(अपवाद - देवी, दासी, दृष्टी इत्यादी)

नियम 4 - ऊकारान्त स्त्रीलिंगी नामाचे अनेकवचन वाकारान्त होते.

उदा. जाऊ- जावा, पिसू- पिसवा, जळू- जळवा.

(अपवाद - वाळू, वस्तू, बाजू)

नियम 5 -ओकारान्त स्त्रीलिंगी शब्द 'बायको' असून त्याचे अनेकवचन 'बायका' असे होते.

नपुंसकलिंगी नामांची अनेकवचने

नियम 1 -अकारान्त नपुंसकलिंगी नामाचे अनेकवचन एकारान्त होते.

उदा. मंडळ- मंडळे, चित्र- चित्रे, रोप- रोपे.

नियम 2 – ईकारान्त नपुंसकलिंगी नामाचे अनेकवचन तेच राहते.

उदा. पाणी- पाणी, लोणी – लोणी.

नियम 3 - उकारान्त आणि ऊकारान्त नपुंसकलिंगी नामाचे अनेकवचन एकारान्त होते. क्वचित प्रसंगी ते वेकारान्त होते.

उदा. पाखरू – पाखरे, आसू – आसवे, पिलू – पिल्ले.

नियम 4 - एकारान्त नपुंसकलिंगी नामाचे अनेकवचन ईकारान्त होते.

उदा. रताळे- रताळी, नाणे- नाणी, लाटणे- लाटणी

(अपवाद - सोने, रुपे, तांबे, शिसे यांची अनेकवचने एकवचनाप्रमाणे राहतात.)

- **हे लक्षात ठेवा.**

- नामांच्या तीन प्रकारांपैकी सामान्यनामांची अनेवचने होतात.
- विशेषनामांची व भाववाचक नामांची अनेकवचने होत नाहीत.

Q. R. कोड

सराव प्रश्न

प्र.1 पुढीलपैकी कोणत्या पर्यायांतील नामांची अनेकवचनी रूपे होतात? (2020)

(दोन पर्याय निवडा.)

1) युक्ती 2) सक्ती 3) भक्ती 4) क्लृप्ती

प्र.2 वचन प्रकारानुसार विसंगत नाम कोणते ? (2023)

1) चुली 2) मुली 3) झुली 4) फुली

प्र.3 पुढीलपैकी पुल्लिंगी नाम कोणते ? (2023)

1) गवळी 2) साखळी 3) पाकळी 4) कवळी

प्र. 4 पुढीलपैकी लिंग प्रकारानुसार विसंगत असणारा शब्द पर्यायातून निवडा. (2021)

1) मळे 2) डोळे 3) कावळे 4) स्थळे

प्र.5 पुढीलपैकी निश्चितपणे अनेवचनी शब्द असणारा पर्याय निवडा. (2021)

1) भरारी 2) बासरी 3) चादरी 4) तुतारी

प्र. 6 पुढीलपैकी वचन बदलानुसार विसंगत जोडी ओळखा. (2022)

1) साध्वी – साध्वी 2) टिच – टिचा 3) आसू – आसवे 4) तिथी – तिथ्या

प्र. 7 पुढीलपैकी विरुद्धलिंगी शब्दाच्या चुकीच्या जोड्या कोणत्या? (2017)

(दोन पर्याय निवडा)

1) आत्मज – आत्मजा 2) महोदय – महोदया
3)अज – अजी 4) नर्तिका – नर्तन

प्र. 8 'शाखामृग' या झाडावरून त्या झाडावर उड्या मारतो. या वाक्यातील अधोरेखित शब्दाचे विरुद्धलिंगी नाम कोणते ? (2018)

1) वानरी 2) हरिणी 3) सारिका 4) मृगी

प्र. 9 पुढीलपैकी पुल्लिंगी नाम कोणते? (दोन अचूक पर्याय निवडा)(2024)

1) घरटे 2) खराटे 3) बोभाटे 4) संकटे

प्र.10 पुढीलपैकी अचूक विरुद्धलिंगी जोडी ओळखा. (2025)

(दोन पर्याय निवडा)

1) धनवान – धनवनी   2) मालक – मालकी
3)शक्तिमान – शक्तीमती   4) तनय – तनया

प्र. 11 पुढीलपैकी निश्चितपणे एकवचनी नाम कोणते? (2025)

(दोन अचूक पर्याय निवडा)

1) धागे   2) वांगे   3) गाडगे   4) खळगे

प्र.12 पुढीलपैकी लिंग प्रकारानुसार विसंगत असणारा शब्द पर्यायातून निवडा.

1) पाखरे   2) किनारे   3)झरे   4) निवारे

प्र.13 पुढीलपैकी चुकीची विरुद्धलिंगी जोडी ओळखा.

1) आत्मज – आत्मजा   2) व्याही – विहीण   3) गृहस्थ – गृहस्थी   4) विद्वान – विदुषी

प्र. 14 वचन बदलानुसार अयोग्य जोडी कोणती?

1) गाऱ्हाणे – गाऱ्हाणी   2) आव्हान – आव्हाने   3) निवेदन – निवेदन   4) कागद – कागद

उत्तरे

1. 1 व 4
2. 4
3. 1
4. 4
5. 3
6. 4
7. 3 व 4
8. 1
9. 2 व 3
10. 3 व 4
11. 2 व 3
12. 1
13. 3
14. 3